गोपनीय

क्रमांक : का.स./बैठक/२५३

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २९ जून, २०१७

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २६ मे, २०१७ रोजी झालेल्या २५३व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

२९/६/१७

सचिव,
कार्यकारी समिती

प्रति :

मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - अध्यक्ष

श्री. द. म. सुकथनकर
"प्रिया", वरळी सी फेस,
वरळी, मुंबई - ४०० ०१८. - सदस्य

श्री. एन्. व्ही. मेराणी
ए/४७, आदर्श नगर,
वरळी, मुंबई - ४०० ०२५. - सदस्य

डॉ. शिरीष संख्ये
संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,
एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,
नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. - सदस्य

अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

प्रधान सचिव (१),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

अपर मुख्य सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

अपर मुख्य सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

-----------xox----------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २५३वी बैठक

| | |
|---|---|
| **दिनांक :** | **२६ मे, २०१७ (शुक्रवार)** |
| **वेळ :** | **सायंकाळी ६.०० वाजता** |
| **स्थळ :** | **मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>सहावा मजला, मंत्रालय,<br>मुंबई – ४०० ०३२** |

**उपस्थित सदस्य :**

श्री. सुमित मल्लिक - अध्यक्ष
मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन

श्री. द. म. सुकथनकर - सदस्य

श्री. ना. वि. मेराणी - सदस्य

श्री. नितीन करीर - सदस्य
प्रधान सचिव (१),
नगर विकास विभाग

श्री.यु.पी.एस. मदान - सदस्य
महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**निमंत्रित :**

श्री.सुनिल पोरवाल
अपर मुख्य सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग

श्रीमती वंदना कृष्णा
प्रधान सचिव,
(अपर मुख्य सचिव यांचे प्रतिनिधी),
वित्त विभाग

श्री. प्रविण दराडे
अति.महानगर आयुक्त / प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय खंदारे
अति.महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. माधव नागरगोजे
वित्त सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मूर्ती
संचालक (प्रकल्प),
मेट्रो अंमलबजावणी शाखा
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती उमा अडुसुमिल्ली
प्रमुख,
नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती विजयालक्ष्मी
प्रमुख,
परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. डी. टी. ठुबे
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. द. ता. डांगे
प्रमुख सल्लागार,
पाणी पुरवठा व स्त्रोत व्यवस्थापन कक्ष,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दि. न. कवठकर
उप-महानगर आयुक्त (प्रशासन),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. रा. म. गोटाफोडे
मुख्य लेखा अधिकारी,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय नानावटे
सचिव,
कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे स्वागत व अभिनंदन केले.

त्यानंतर, श्री. सुनिल पोरवाल, अपर मुख्य सचिव (उद्योग), उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे कार्यकारी समितीचे नवे 'पदसिध्द निमंत्रित' म्हणून स्वागत व अभिनंदन केले.

तसेच श्री. अपूर्व चंद्र, माजी प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांनी कार्यकारी समितीचे 'पदसिध्द निमंत्रित' म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**<u>बाब क्र.१ :</u>** **<u>प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०३ एप्रिल, २०१७ रोजी झालेल्या २५२व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.</u>**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**<u>बाब क्र.२ :</u>** **<u>प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०३ एप्रिल, २०१७ रोजी झालेल्या २५२व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.</u>**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>बाब क्र.३ :</u>** **<u>नागपूर-मुंबई कृषी समृध्दी महामार्गाकरीता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास कर्ज सहाय्य देणे.</u>**

३.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक १२/०४/२०१७ रोजीच्या टिप्पणीनुसार राज्य शासनाने नागपूर-मुंबई या दोन शहरांना जोडण्यासाठी नागपूर-मुंबई कृषी समृध्दी महामार्गाचे बांधकाम करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला असून सदर महामार्गाच्या बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ हे अंमलबजावणी संस्था म्हणून कार्य करीत आहे.

३.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सदर महामार्गाच्या बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास राज्य शासनही निधी उपलब्ध करुन देणार आहे. तसेच या

महामार्गाकरीता लागणाऱ्या जमिनी अधिग्रहण करण्याकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (रु. १,५०० कोटी), सिडको (रु. १,००० कोटी), झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण (रु.१,००० कोटी), महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (रु. १,००० कोटी) आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (रु. ५०० कोटी) असे एकूण रु. ५,००० कोटी वरील विविध संस्थांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला कर्ज रुपाने निधी उपलब्ध करुन दिल्यास महामार्गाचे बांधकाम सन २०१९ पर्यंत पूर्ण करणे शक्य होईल असे लेखी निर्देश मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून प्राप्त झाले होते. तथापि, नगर विकास विभागाच्या दिनांक १८/०५/२०१७ रोजीच्या फॅक्सव्दारे प्राप्त झालेल्या पत्रानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने रु. १,००० कोटी इतका निधी सदर प्रकल्पासाठी उपलब्ध करुन देण्यात यावा, असा निर्णय झाल्याचे कळविले आहे.

३.३ महानगर आयुक्त यांनी सदर प्रकल्पाबाबत माहिती देताना असे सांगितले की, सदर प्रकल्पाकरीता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाव्दारे सुमारे १० हजार हेक्टर ग्रीनफिल्ड जागेचे भूसंपादन करण्यात येत आहे. सदर महामंडळास एकूण प्रकल्प किंमतीच्या रु.४६,००० कोटी पैकी सदर जागेचे भूसंपादन करण्याकरीता रु.१३,००० कोटीचे अर्थसहाय्य कर्ज स्वरुपात त्वरीत उभारणे आवश्यक आहे. सदर समृध्दी महामार्गाच्या एकूण ७०१ कि.मी. लांबीपैकी मुंबई महानगर प्रदेशात सुमारे १३.५ कि.मी. इतक्या लांबीचा समावेश आहे. महानगर आयुक्त यांनी असेही निर्दशनास आणले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ नुसार प्राधिकरणाच्या सीमा क्षेत्रात असलेल्या प्रकल्पाकरीता कर्ज देता येते. सदर प्रकल्पाचा काही भाग हा महानगर क्षेत्रात येत असून तेवढया किंमतीपर्यंत कर्ज देण्यास अडचण नाही. तसेच प्राधिकरणामार्फत व इतर चार संस्थांमार्फत उपलब्ध होणारे कर्ज हे दुय्यम स्तरीय कर्ज असेही नमूद केलेले आहे. शासनाने सदर प्रकल्पास प्राधिकरणामार्फत रु.१,००० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याचे निर्देश एक आठवडयापूर्वीच मिळाले असल्यामुळे आणि प्रकल्पाची सविस्तर आकडेवारी महामंडळाकडून प्राप्त न झाल्यामुळे सदर प्रकल्पाची तांत्रिक छाननी तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची कर्ज परतफेड करण्याबाबतची क्षमता याबाबतची वित्तीय पडताळणी प्राधिकरणाव्दारे होऊ शकली नाही.

३.४ महानगर आयुक्त यांनी सदर प्रकल्पाच्या कर्ज प्रस्तावाबाबत असेही सांगितले की, महामंडळाने माहिती दिल्यानुसार सदर नागपूर-मुंबई कृषी समृध्दी महामार्ग हा मुंबई महानगर प्रदेशातून सुरु होत असल्याने सदर महामार्गामुळे प्रदेशातील दळणवळण यंत्रना जोडली जाऊन राज्यस्तरीय दळणवळण यंत्रणेस हातभार लागणार आहे. तसेच संपूर्ण राज्यात महामार्गाच्या सभोवताली प्रस्तावित औद्योगिक व इतर उपक्रमांमुळे महाराष्ट्र राज्यासोबत प्रदेशाची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल. महामंडळास प्राधिकरण तसेच इतर चार संस्थेंकडून सदर समृध्दी महामार्गाच्या भूमी संपादनाकरीता तात्काळ कर्ज हवं असल्याने शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे रु.१,००० कोटी किंवा वर नमूद केल्याप्रमाणे सदर मार्गाच्या भूसंपादनाच्या अंदाजित खर्चापैकी मुंबई महानगर प्रदेशातून जाणाऱ्या लांबीच्या हिस्स्याप्रमाणे येणारी रक्कम यापैकी जी कमी असेल ती रक्कम कर्ज म्हणून मुंबई नागरी विकास प्रकल्प – फिरता निधीतून द.सा.द.शे. ८% दराने अंमलबजावणी कालावधी २ वर्ष असल्याने २ वर्ष कर्ज परतफेडीतील सुटीचा कालावधी (मोरॅटोरियम) देऊन त्यानंतर पुढील १० वर्षात कर्ज परतफेडीच्या कालावधीकरीता बाब टिप्पणीत नमूद केलेल्या अटी व शर्तीवर कर्ज देण्याचे प्रस्तावित आहे.

३.५ सदर प्रस्तावावर कार्यकारी समितीने दिलेले निर्देश तसेच सदस्यांनी उपस्थित केलेले मुद्दे व अभिप्राय :

३.५.१ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास सदर रु. १००० कोटी कर्ज स्वरुपात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने देण्याबाबत शासनाने निर्देश दिल्यानंतर त्याचे थेट अनुपालन करावे किंवा कार्यकारी समिती समोर सदर प्रस्तावास मान्यता देण्यासाठी सादर करणे आवश्यक आहे याबाबत स्पष्टता दिसून येत नाही. तथापि, मुबलक काळजी म्हणून मान्यतेसाठी सादर करण्यात आले असे समजण्यात यावे.

३.५.२ सदर कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत प्राधिकरणास निर्देश देण्यापूर्वी सदर प्रकल्पाची पडताळणी तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे सदर कर्ज घेण्याबाबत आर्थिक स्थितीच्या क्षमतेची पडताळणी या सर्व बाबींची पडताळणी

शासन स्तरावर झालेली असेल असे समजून प्राधिकरणामार्फत सदर बाबींची पडताळणी करण्यात आलेली नसल्याचे गृहीत धरण्यात येत आहे.

३.५.३ श्री. द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सूचित केले की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ हे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २१ अ प्रमाणे प्राधिकरण म्हणून संबोधण्यात येत नाही. याबाबत महानगर आयुक्तांनी असे स्पष्ट केले की, सर्व शासकीय संस्था 'इतर संस्था' या संवर्गात समाविष्ट आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि सिडको यासारख्या संस्थांना प्राधिकरणामार्फत यापूर्वी कर्ज उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

**<u>निर्णय :</u>** **<u>सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-</u>**

**<u>ठराव क्र. १३२५ :</u>**

"**असा ठराव करण्यात येतो की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २१अ अन्वये प्राधिकरणास प्राप्त झालेल्या व त्यास यासंबंधी सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याव्दारे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या 'नागपूर-मुंबई कृषी समृध्दी महामार्ग' प्रकल्पासाठी शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे रु. १००० कोटी किंवा सदर मार्गाचा मुंबई महानगर प्रदेशातून जाणाऱ्या लांबीच्या भूसंपादन आणि बांधकामावर होणाऱ्या एकूण अंदाजित खर्चाच्या हिस्स्याप्रमाणे येणारी रक्कम यापैकी जी कमी असेल ती रक्कम मुंबई नागरी विकास प्रकल्प – फिरता निधीतून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास कर्ज म्हणून द.सा.द.शे. ८% व्याजदर आकारुन १० वर्षाच्या कर्ज परतफेडीच्या कालावधीसाठी (२ वर्ष कर्ज परतफेड सुटीचा कालावधी वगळून) बाब टिप्पणीत प्रस्तावित केलेल्या अटींच्या अधीन राहून देण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** कर्जाची रक्कम, व्याजदर आणि कर्ज परतफेडीचा कालावधी या अटींव्यतिरिक्त एस्क्रो खात्यासंबंधी तपशिल व कर्ज परतफेडीतील सुट्टीचा कालावधी निश्चित करुन, प्रकल्प अंमलबजावणी कालावधी, आगाऊ कर्ज सहाय्य देणे तसेच कर्जाच्या इतर अटी व शर्तीमध्ये आवश्यक सुधारणा करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ :** **मुंबई महानगर क्षेत्रातील पश्चिम उप-प्रदेशातील मिरा-भाईंदर व वसई-विरार महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी ४०३ द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेच्या सूर्या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेची रचना, उभारणी, प्रचलन व परिरक्षण आणि हस्तांतरीत (Design, Build, Maintain, Operate and Transfer, (DBMOT) या आधारावर अंमलबजावणी करणे.**

४.१ महानगर आयुक्त यांनी बाब टिप्पणीतील विषयाबद्दल माहिती देताना असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी झालेल्या १४१व्या बैठकीत ४०३ द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेच्या सुर्या नळ पाणी पुरवठा योजनेस रु. १९७७.२९ कोटी इतक्या अंदाजित खर्चासह सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. त्यानुसार योजनेच्या अंमलबजावणीची कामे रचना, उभारणी, प्रचलन व परिरक्षण आणि हस्तांतरीत (Design, Build, Maintain, Operate and Transfer, (DBMOT)) या आधारावर करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात आल्या व दिनांक ९.२.२०१७ रोजी खालील चार निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या :-

१) मेसर्स जी.व्ही.पी.आर. इंजिनिअर्स लि. + मेसर्स आय.व्ही.आर.सी.एल. लि. + मेसर्स जीओ मिलर ॲन्ड कं. प्रा. लि.

२) मेसर्स एल ॲन्ड टी लि.

३) मेसर्स मेघा इंजिनिअरिंग ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर्स लि.+ मेसर्स एन.सी.सी. लि.

४) मेसर्स रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. + मेसर्स प्रतिभा इंडस्ट्री लि.

वरील निविदांची छानणी केली असता असे दिसून आले की, मेसर्स जी.व्ही.पी.आर. इंजिनिअर्स लि. + मेसर्स आय.व्ही.आर.सी.एल. लि. + मेसर्स जीओ मिलर ॲन्ड कं. प्रा. लि. यामध्ये मेसर्स जीओ मिलर ॲन्ड कं. प्रा. लि. यांना बिहार अर्बन इंफ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांनी दिनांक २७.०५.२०१५ रोजी काळ्या यादीत टाकण्यात आले व त्यास

मा.उच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी शिक्कामोर्तब केले असल्याने निविदेतील अटीनुसार त्यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली. त्याचप्रमाणे मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. + मेसर्स प्रतिभा इंडस्ट्री लि. यांच्या निविदेमध्ये मेसर्स प्रतिभा इंडस्ट्री लि. यांची २ कामे PHED, अजमेर, राजस्थान शासन यांनी रद्द करुन त्यांच्या जोखमीवर (Risk and Cost) करण्यात आल्याने निविदेतील तरतुदीनुसार त्यांना अपात्र ठरविण्यात आले. उर्वरित मेसर्स एल. ॲन्ड टी. लि. आणि मेसर्स मेघा इंजिनिअरिंग ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. + मेसर्स एन.सी.सी. लि. यांचे देकार निविदेतील सर्व निकष पूर्ण करीत असल्याने त्यांना पात्र ठरविण्यात आले. त्यातील मेसर्स एल. ॲन्ड टी. लि. यांनी रु.१३२९.०१ कोटी म्हणजे अंदाजपत्रकीय मुल्य रु. १६११.८६ कोटी पेक्षा १७.५५ % कमी व मेसर्स मेघा इंजिनिअरिंग ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. + मेसर्स एन.सी.सी. लि. यांनी रु. १८९८.९२ कोटी म्हणजे अंदाजपत्रकीय मुल्यापेक्षा १७.८१% ज्यादा असे आर्थिक देकार देण्यात आले. यामध्ये योजनेची संपूर्ण कामे पूर्ण करुन ती कार्यान्वित करणे व पुढील ८ वर्षाच्या कालावधीत त्याचे प्रचलन व परिरक्षणाची कामे हाताळण्याचा समावेश आहे. मेसर्स एल. ॲन्ड टी. लि. यांचा देकार १०% पेक्षा जास्त किंमतीने कमी असल्याने त्यांच्याकडून निविदेतील अटीनुसार अतिरिक्त अनामत रक्कम म्हणून रु.१२१.६४ कोटी घेण्यात येत आहे.

४.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही स्पष्ट केले की, मेसर्स एल. ॲन्ड टी. लि. यांचा प्रस्ताव १७.५५% कमी असल्याबाबतचे स्पष्टिकरण मागविण्यात आले असता त्यांनी त्यांच्या संकल्पचित्रात बऱ्याच गोष्टी स्वयंचलित पध्दतीने, In house procurement, supply chain management इत्यादी बाबी हाताळण्याचे कौशल्य असल्याने खर्च कमी येतो असे कळविले आहे. या सर्व बाबींचा विचार करुन मेसर्स एल. ॲन्ड टी. लि. यांची लघुत्तम निविदा स्विकारण्याचे प्रस्ताविण्यात आलेले आहे. त्यावर सभासदांनी विचारणा केली की, प्रस्तुत योजनेतून महानगरपालिकेस घाऊक प्रमाणात (Bulk Water Supply) पाणी पुरवठा करण्यात येणार आहे का? शिवाय यात कोणत्या विविध कामांचा समावेश आहे, यावर स्पष्टिकरण देताना महानगर आयुक्त यांनी सांगीतले की, प्रस्तुत योजना ही घाऊक पाणी पुरवठा योजना (Bulk Water Supply) असून यासाठी सुर्या धरणाजवळील कवडास बंधाऱ्यातून पाणी उचलण्यात येणार असून त्यात उद्ंचन केंद्र, विद्युत केंद्र, जलप्रक्रिया केंद्र ३ बोगदे, जलाशय आदी बाबींचा समावेश असून एकुण ८८ कि.मी लांबीची जलवाहिनी राष्ट्रीय महामार्गाच्या बाजूने टाकण्यात येणार आहे. दोन्ही

महानगरपालिकेसाठी जलाशय (MBR) बांधून त्यांना घाऊक प्रमाणात पाणी पुरवठा होणार आहे. दोन्ही महानगरपालिकेकडून पाण्याची बिले भरण्याबाबतचा प्रश्न उपस्थित झाला असता दोन्ही महानगरपालिकेच्या महासभेत त्यानुसार ठराव करुन मान्यता देण्यात आली आहे. कार्यकारी समितीचे सदस्य श्री. नितीन करीर, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनीही नमूद केले की, मुंबई महानगर प्राधिकरण क्षेत्रातील महापालिका पाण्याची बिले देण्यास सक्षम आहेत.

निर्णय: **चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३२६ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे सुर्या नळ पाणी पुरवठा योजनेची कामे सर्वसाधारण रचना, उभारणी, प्रचलन व परिरक्षण आणि हस्तांतरीत या आधारे (Design, Build, Maintain, Operate and Transfer, (DBMOT)) करण्यासाठी मेसर्स एल. अॅन्ड टी. लि. यांच्या एकूण रु.१३२९.०१ कोटी रक्कमेच्या लघुत्तम निविदेस मान्यता आहे. त्याअनुषंगाने येणाऱ्या करारनाम्यातील अटी व शर्तीप्रमाणे, देय होणाऱ्या संभाव्य बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : वांद्रे-कुर्ला संकुल, 'जी' ब्लॉक, मधून जाणारी उच्च दाबाची विद्युत वाहिनी भूमिगत करणेकरीता मंजूरी मिळणेबाबत.**

५.१ वरील विषयावर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मेट्रो मार्ग-२ ब डि.एन.नगर ते मंडाळे हा उन्नत मेट्रो प्रकल्प वांद्रे-कुर्ला संकुल मधून जात असून या प्रकल्पासाठी स्थापत्य कामाकरीताच्या निविदा दिनांक ३, ४ व ५ मे, २०१७ रोजी स्विकारण्यात आलेल्या

आहेत. या मेट्रो कामाकरीता विविध ठिकाणी कास्टींग यार्ड उभारण्याकरीता जागा लागणार आहे. वांद्रे-कुर्ला संकुल मधील 'जी'ब्लॉक मध्ये मिठी नदीला लागून जागा उपलब्ध आहे. परंतू, सदर भूखंडाला लागून असणारी ४ हेक्टर जागा भूमीगत मेट्रो मार्ग -३ करीता लागणाऱ्या कास्टींग यार्ड साठी कंत्राटदाराला देण्यात आलेली आहे. सदर भूखंडावर विद्युत दाब असणाऱ्या उच्च वाहिनीचे मनोरे आहे. सदर भूखंडामधून जाणारे मनोरे व तार मे. टाटा पॉवर कंपनी लिमिटेड यांच्या मालकीचे असून कास्टींग यार्ड उभारण्यासाठी अडचणीचे ठरत आहे. त्यामुळे २.८ कि.मी. लांबीची वाहीनी भूमीगत करणे गरजेचे आहे. सदर वाहीनी भूमीगत करण्यासाठी मे. टाटा पॉवर कंपनी लिमिटेड ने ५८.६२ कोटी इतकी रक्कम अंदाजीत केलेली आहे. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सदर अंदाजपत्रक दिल्ली मेट्रो रेल महामंडळ आणि महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्रतिनियुक्तीवर असलेले अधिक्षक अभियंता यांच्या कडून तपासून घेण्यात आलेले आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे सांगितले की, सदर मनोरे व विद्युत वाहक तारा भूमीगत करण्याच्या आवश्यक्यतेबाबत निर्णय घेण्यासाठी अति. महानगर आयुक्त, प्रमुख, नगर व क्षेत्र विभाग व उप महानगर आयुक्त, भूमी व मिळकत शाखा या तिघांनीही प्रत्यक्ष जागेवर संयुक्त पाहणी केली आहे. सदर विद्युत वाहिनी भूमीगत केल्यास मेट्रो प्रकल्पाचे कास्टींग यार्ड कामातील अडचणी दूर होतील. तसेच प्राधिकरणाला सुमारे ३.२४ हेक्टर जमीन विकास कामासाठी उपलब्ध होणार आहे. ज्याची किंमत आजच्या भावपातळीनुसार सुमारे रु.५०० ते रु.६०० कोटी मिळण्याचे अपेक्षित आहे. त्यामुळे संयुक्त पाहणीनंतर सदर भूखंडामधून जाणाऱ्या विद्युत वाहीनीला भूमीगत करण्यास शिफारस केली.

५.२ श्री. द. म. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, या वरील कामासाठी लागणारी रक्कम मेट्रो मार्ग-३ आणि मेट्रो मार्ग -२ब या दोन्ही मार्गाच्या कंत्राटदारांकडून वसूल करण्यात येणार काय? महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, या मेट्रो कामाला लागणारी जागा तात्पुरत्या स्वरुपात असल्यामुळे कंत्राटदाराला रु.१ या नाममात्र दराने कास्टींग यार्ड साठी जागा देण्याचा निर्णय या अगोदरच प्राधिकरणाने घेतला आहे.

५.३ मा. मुख्य सचिव आणि अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, वरील काम निविदा बोलवून करुन घेता येऊ शकते का? यावर विषद करतांना महानगर आयुक्त यांनी सांगितले की, असे करणे शक्य असले तरी वरील मनोरे आणि तारा या मे. टाटा पॉवर कंपनीच्या मालकीच्या असून हे काम दुसऱ्या कंत्राटदाराकडून करुन घेण्यास अडचणी येण्याची शक्यता

आहे. तसेच, वरील कामाकरीता लागणारे साधन सामर्गी व अंमलबजावणी यासाठी मे. टाटा पॉवर कंपनीची पूर्व मंजूरी घेणे आवश्यक आहे. तसेच मे. टाटा पॉवर यांच्या देखरेखीमध्ये काम करावे लागणार आहे. त्यासाठी टाटा पॉवर कंपनीला देखरेख शुल्क द्यावा लागतो. त्यामुळे मे. टाटा पॉवर कंपनी कडून काम करुन घेतल्यास आर्थिकदृष्टया कमी खर्चात व वेळेची बचत होईल. मा. मुख्य सचिव यांनी पुढे अशीही विचारणा केली की, वरील अंदाजपत्रक संबंधीत विद्युत विभागाकडून चाचणी करुन घेण्यात आले का? महानगर आयुक्त यांनी सांगितले की, वरील अंदाजपत्रक महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड यांच्याकडून प्रतिनियुक्तीवर घेण्यात आलेले अधिक्षक अभियंता तसेच दिल्ली मेट्रो रेल महामंडळ यांच्या मुख्य अभियंता यांच्याकडून चाचणी करुन घेण्यात आलेले आहे आणि त्यांनी मे. टाटा पॉवर कंपनी यांनी दिलेले अंदाजपत्रक वाजवी आहे अशी शिफारस केली आहे.

**निर्णय:** **वरील चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३२७ :**

“**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन), अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे बीकेसी, जी ब्लॉकमधून जाणारी उच्च दाबाची विद्युत वाहिनी भूमिगत करुन घेण्याचे काम मे. टाटा पॉवर कंपनी यांच्याकडून deposit work तत्वावर करुन घेण्याकरीता रु. ५८.६२ कोटी + सेवा कर इतकी रक्कम मे. टाटा पॉवर कंपनीला देण्यास मान्यता देत आहे.

“**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**<u>बाब क्र.६ :</u>** **<u>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी अत्याधुनिक पध्दतीची कार्यालयीन इमारत व निवासी इमारत बांधणे.</u>**
**<u>- मंजूर निविदेवरील वाढीव खर्चास व अतिरिक्त बाबी तसेच इमारतीसाठी आवश्यक असलेल्या फर्निचर, विद्युतीकरण, उदवाहने व वातानुकुलीत यंत्रणा इ. सेवाविषयक एकत्रित कामांसाठी प्राधिकरणाकडून सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी शिफारस करणेबाबत.</u>**

६.१ या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी सविस्तर माहिती समितीस दिली. महानगर आयुक्त यांनी असे विषद केले की, सदर प्रस्तावातील मूळ स्थापत्य कामांच्या मंजुर निविदा रक्कमेत (रु.४८.९१ कोटी) झालेल्या वाढीव व्याप्तींमुळे रु. ७८.७४ कोटी इतक्या सुधारित अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेस्तव बाब टिपणी कार्यकारी समितीच्या दिनांक १०.०७.२०१२ रोजी झालेल्या २३४ व्या बैठकित सादर करण्यात आली होती. त्यावर कार्यकारी समितीने वाढीव खर्चास तसेच अतिरिक्त बाबीस मंजूरी देण्यापूर्वी या सर्व बाबी कशाप्रकारे उद्भवल्या व इमारत पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणत्या उपाययोजना करणे क्रमप्राप्त ठरेल या सर्व बाबी तपासण्याकरीता कार्यकारी समितीचे तज्ञ सदस्य, श्री. ना.वि. मेराणी यांची एक सदस्यीय समिती नियुक्त केली. त्या अनुषंगाने मेराणी समितीने प्रकल्पाची पाहणी केली तसेच कार्यालयीन दस्ताऐवजावरुन वाढीव व अतिरिक्त बाबी कशा उद्भवल्या यांची सविस्तर तपासणी केली.

६.२ महानगर आयुक्त यांनी असेही विषद केले की, मेराणी समितीने सुचविल्याप्रमाणे मूळ निविदेतील वाढीव व्याप्ती व्यतिरिक्त कार्यालयीन इमारतीच्या इतर कामांबाबत (बाहय दर्शनी कामे, अंतर्गत स्थापत्य कामे, उद्वाहनांची कामे, विद्युत, वातानूकुलित यंत्रणा व अंतर्गत सजावटींची कामे इ.) एकत्रितपणे कार्यान्वयनाची कार्यवाही पूर्ण करुन कार्यालयीन इमारतीची एकूण किंमत रु. ११५.५४ कोटी (निविदा अटी व शर्तीनुसार देय असणा-या भाववाढीसह) इतकी असून, निवासी इमारतीची किंमत रु. १७.६५ कोटी इतकी आहे. त्याप्रमाणे दोन्ही इमारतीची एकूण किंमत रु. १३३.२० कोटी इतकी आहे. निवासी इमारतीचे बांधकाम माहे मे, २०१० मध्ये पूर्ण झाले असून कार्यालयीन इमारतीचे काम माहे डिसेंबर, २०१५ मध्ये पूर्ण झाले असून इमारतीचा प्रत्यक्षपणे वापर माहे जानेवारी, २०१६ पासून सुरु झालेला आहे.

६.३ महानगर आयुक्त यांनी सदर प्रकल्पाच्या वास्तुविशारद व प्रकल्प सल्लागार यांच्या बाबत माहिती देतांना असे सांगितले की, सल्लागाराचे मूळ शुल्क रु. ७०.३२ लक्ष (म्हणजेच ०.९%

..१३/-

वास्तुविशारद पोटी व ०.९% प्रकल्प सल्लागारापोटी) इतके होते. मेराणी समितीने त्यांचे अहवालात सल्लागाराचे शुल्क मूळ निविदा किंमतीच्या आधारावरच सिमीत करावे असे सूचविले होते. परंतु सुरुवातीस निवासी इमारतीच्या संपूर्ण बांधकामाकरीता व कार्यालयीन इमारतीचा केवळ सांगाडा उभारणीच्या कामाकरीता निविदा मागवून प्रत्यक्ष बांधकाम माहे मार्च, २००८ मध्ये सुरु करण्यात आले. कार्यालयीन इमारतीकरीता लागणा-या इतर बाबींसाठी म्हणजे बाहय दर्शनी भागाचे काम, अंतर्गत स्थापत्य व उदवाहनाचे काम, अंतर्गत सजावटीचे काम, विदयुतीकरणाचे काम, वातानुकूलित यंत्रणेसंबंधीचे काम इ. कामे टप्याटप्याने सक्षम प्राधिका-याची मंजूरी घेऊन निविदा मागविण्यात आल्या. याकरीता बराच कालावधी लागला. तसेच वरील सर्व बाबींची व्याप्ती सल्लागारास वास्तुविशारद व प्रकल्प सल्लागार या नात्याने पूर्ण करण्याचे त्यांच्या कंत्राटात नमूद होते. त्याबरोबरच इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्याची जबाबदारी सल्लागाराचीच होती. सबब सल्लागाराच्या मूळ शुल्कात कामांच्या मूळ निविदांच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे तसेच कंत्राटातील तरतूदीनुसार सल्लागारास वाढीव कालावधीकरीता देय असलेल्या वाढीमुळे सल्लागाराच्या शुल्कात वाढ झालेली आहे. यास्तव, श्री. तांबे, माजी सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची एक सदस्यीय समिती नेमण्यात आली. समितीने सल्लागारास नेमून दिलेल्या कामांचा व प्रकल्पाच्या कामांचा वाव यांचा सविस्तरपणे अभ्यास केला. समितीने वास्तुविशारद व प्रकल्प सल्लागार यांचे मूळ शुल्क व प्रकल्पाच्या वाढीव व्याप्तीमुळे प्रकल्प सल्लागारास वाढीव कालावधीकरीता प्रतीमाह शुल्क देण्याबाबतची शिफारस अहवालानुसार केलेली आहे. सदर अहवालानुसार सल्लागारास माहे डिसेंबर, २०१५ अखेरपर्यंत रु. ५.११ कोटी इतके शुल्क अदा करण्यात आलेले आहे. तांबे समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार प्रकल्प सल्लागारास माहे मार्च, २०१६ अखेरपर्यंत एकूण रु. ५.६९ कोटी इतके शुल्क अदा करावे लागेल. परंतु सल्लागाराने माहे मार्च, २०१६ अखेरपर्यंत एकूण रु. ११.८८ कोटी इतके शुल्क मिळणेबाबत मागणी केलेली आहे असे समितीच्या निदर्शनास महानगर आयुक्तांनी आणले. तसेच कार्यकारी समितीने निर्देशित केल्याप्रमाणे प्रकल्पाच्या संरचनेत करावे लागलेले बदल हे प्रकल्प सल्लागाराच्या कामातील उणिवांमुळे आहेत किंवा कसे याबाबत तांबे समितीचा अंतिम अहवाल अपेक्षित आहे. अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर समितीच्या शिफारशीनुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

६.४ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सदर प्रस्ताव हा कार्यकारी समितीच्या दिनांक २०.०९.२०१६ रोजी झालेल्या २५०व्या बैठकित मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा सुध्दा झाली होती. चर्चेअंती, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी निर्देशित केले की, मेराणी समितीचा अहवाल सिलबंद पाकिटात कार्यकारी समितीच्या सर्व सदस्य / निमंत्रित यांना माहितीसाठी पाठवून त्यावर त्यांचे मत घ्यावे व सदर बाब पुढील कार्यकारी समितीच्या बैठकित अंतिम निर्णयासाठी फेरसादर करावी. त्यानुसार दिनांक ०७.०८.२०१२ रोजीचा मेराणी समिती अहवाल दिनांक २५.१०.२०१६ रोजी महानगर आयुक्त यांच्या स्वाक्षरीने कार्यकारी समितीच्या सर्व सदस्यांना पाठविण्यात आला व त्यावर सदस्यांचे मत प्राधिकरणाकडे पाठविण्यात यावे अशी विनंती केली. तद्नंतर दिनांक ११.०१.२०१७ रोजी सदर विषयाबाबत सर्व सदस्यांना स्मरणपत्रे महानगर आयुक्त यांच्या स्वाक्षरीने पाठविण्यात आली. परंतु अद्यापावेतो सदस्यांचे मत प्राधिकरणास प्राप्त झालेले दिसून येत नाही. सबब सदर बाब पुनश्च: कार्यकारी समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आलेली आहे.

६.५ महानगर आयुक्त यांनी समितीच्या निदर्शनास आणले की, मेराणी समितीच्या अहवालातील सर्व तांत्रिक मुद्यांची पूर्तता करण्यात आलेली आहे.

६.६ चर्चेअंती, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सांगितले की, सदर प्रस्ताव हा पुढील बैठकित फेरसादर करावा किंवा सदर प्रस्ताव मान्यतेकरीता विशेष बैठक आयोजित करावी.

**<u>बाब क्र.७:</u>** **<u>प्राधिकरणाचे दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे.</u>**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली.

**<u>निर्णय :</u>** **<u>प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.</u>**

**<u>बाब क्र.८ :</u>** **<u>प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल - दिनांक ०१ जानेवारी, २०१७ ते दिनांक ३१ मार्च, २०१७</u>**

८.१ महानगर आयुक्त यांनी गुंतवणूकीची माहिती देताना असे नमूद केले की, शासनाच्या दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या निर्णयाप्रमाणे गुंतवणूक करताना बँका / वित्तीय संस्था यांच्या नक्त मूल्यांच्या १५% पेक्षा जास्त निधी एका बँकेत गुंतवू नये असे निर्देश आहेत.

८.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमूद केले की, प्राधिकरणाचा अतिरिक्त निधी गुंतविताना खबरदारीचे अतिरिक्त उपाय म्हणून खाजगी क्षेत्रातील बँका / वित्तीय संस्था यांच्याकडे निधी गुंतविताना प्राधिकरणाच्या एकूण गुंतवणूकीच्या २०% पेक्षा अधिक नाही इतकी कमाल मर्यादा खाजगी क्षेत्रातील बँका / वित्तीय संस्था यांच्याकडील गुंतवणूकीकरीता पाळण्यात येत होती. चलन बंदी नंतर राष्ट्रीयकृत बँकांचे दर कमी झाल्याने प्राधिकरणाचे व्याजाचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून खाजगी बँकांतील गुंतवणूकीची मर्यादा २०% वरुन ४०% पर्यंत करण्यात आली होती. अजूनही खाजगी बँका आणि राष्ट्रीयकृत बँकांच्या व्याजदरांमध्ये मोठा फरक असल्यामुळे आता सदर मर्यादा काढून टाकण्यात आली असून वित्त विभागाच्या निर्देशानुसार गुंतवणूक करण्यात येते आहे.

**<u>निर्णय :</u>** **<u>सदरहू गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.</u>**

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

**********